झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.मुंबई/मुकाअ/परिपत्रक/गाळे सोडत/सन २००५/९५
गृहनिर्माण भवन,५ वा माळा,बांद्रा-पूर्व,मुंबई-५१.
दिनांक : १५/०४/२००५

परिपत्रक : - ७१

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना सोडत (लॉटरी) पद्दतीने पुनर्वसन सदनिका वितरण करण्याबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिका वितरण बाबत मार्गदर्शक सूचना या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ५५ दिनांक ५.१.२००३ नूसार देण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिका वितरणासाठी काढण्यात येणारी सोडत (लॉटरी)या प्राधिकरणाच्या सहकार कक्षातील प्रतिनिधीच्या उपस्थितीत काढावेत अशी पद्दत अनिवार्य करण्यात आलेली आहे. उपरोक्त परिपत्रका प्रमाणे सद्या सोडत (लॉटरी) काढण्यात येत असल्या तरीही सोडत(लॉटरी) पद्दती बाबत अनेकविध तक्रारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त होत आहेत. सदर पद्दत अधिक पारदर्शक करण्याचा हेतुने या पुढे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामधील पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिका वितरण सोडत(लॉटरी) पद्दतीने करताना त्याचे "चलत चित्रीकरण" (Video Shooting ) सहकार कक्ष मार्फत करण्यात यावे. व "चलत चित्रीकरण" (Video Shooting) झाल्यानंतर ते दिर्घकाळ जपून ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या प्रवर्ग निहाय त्याची कॉम्पॅक्ट डिस्क (C.D.) सहकार कक्ष तर्फे तयार करण्यात यावी.

दे. चक्रवर्ती.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.